# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७ / (३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)

## क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५

जावक क्र./गों.वि.ग./क्री.शा.शि./ ६९७ /२०२५ दिनांक : २३/०१/२०२५

प्रति,

मा. कुलसचिव / संचालक, विद्यार्थी विकास विभाग / क्रीडा संचालक
सर्व अकृषी / कृषी / संस्कृत / आरोग्य विज्ञान / तंत्रशास्त्र / मुक्त व इतर विद्यापीठे

**विषय :- महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२४, विद्यापीठ पथकासाठी सुचना..**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने २६ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२४ आयोजनाची जबाबदारी गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीकडे सोपविलेली आहे. सदर क्रीडा महोत्सवांतर्गत या विद्यापीठामध्ये मुले व मुलींसाठी ॲथलेटिक्स, बास्केटबॉल कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो, टेबल टेनिस, बॅडमिंटन, व चेस या क्रीडा प्रकारांचा समावेश असून सदरील स्पर्धा या **दिनांक १८ ते २२ फेब्रुवारी, २०२५** या कालावधीत आयोजीत करण्यात येत आहेत.

**सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठी खालील नमुद महत्वपुर्ण बाबींची पुर्तता करावी :-**

१) ॲथलेटिक्स, बास्केटबॉल, कबड्डी, व्हॉलीबॉल, खो-खो या खेळांच्या प्रत्येक संघात एकुण १२ खेळाडू, बॅडमिंटन च्या संघात एकुण ६ खेळाडू, टेबल टेनिस व चेस च्या संघात एकुण ५ खेळाडू व प्रत्येक संघासोबत एक प्रशिक्षक व एक संघ व्यवस्थापक राहिल.

२) ॲथलेटिक्स, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, खो-खो, टेबल टेनिस व बॅडमिंटन या मुला व मुलींच्या स्पर्धा विद्यापीठाचे परिक्षेत्र असलेल्या चंद्रपूर व बल्लारपूर येथे घेण्यात येणार आहेत. कबड्डी व चेस या मुला व मुलींच्या स्पर्धा गडचिरोली येथे घेण्यात येणार आहेत.

३) सदर स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी खेळाडूचे वय १७ वर्षे पुर्ण झालेले असावे.

४) ज्या विद्यापीठांनी अद्यापही प्रवेशिका सादर केलेली नाही त्यांनी अंतिम दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२५ पुर्वी सोबत जोडलेल्या प्रपत्रात भरुन directorsportsgondwanauni@gmail.com या मेल वर सादर करावी.

५) संघ व्यवस्थापकांनी सहभागी खेळाडूंची पात्रता प्रमाणपत्रे ३ प्रतीत नोंदणी केंद्रावर सादर करावे.

६) दि. १८ फेब्रुवारी, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता संघ व्यवस्थापकांची सभा आयोजीत करण्यात आली असून संघ व्यवस्थापकांना सभेला उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

७) व्यवस्थापकांच्या सभेपुर्वी विद्यापीठ संघातील खेळाडूंच्या कागदपत्रांची पडताळणी नोंदणी केंद्रांवर करवून घेण्याची जबाबदारी संबंधीत संघ व्यवस्थापकांची राहिल.

८) संघ व्यवस्थापकांनी नोंदणी केंद्रावर आपल्या विद्यापीठाचे ५ x ३ आकाराचे दोन ध्वज जमा करावे.

९) क्रीडा महोत्सवाच्या सहभाग प्रमाणपत्रासाठी प्रत्यक्ष सहभागी होणाऱ्या खेळाडू, संघ व्यवस्थापक यांची खेळनिहाय माहिती संपूर्ण नाव, आईचे नाव इंग्रजी भाषेत (Times New Roman, Font-12) Soft & Hard Copy स्वरूपात नोंदणी केंद्रावर सादर करावी.

१०) सर्व संघ व्यवस्थापकांनी सुरक्षा अमानत म्हणून नोंदणीचे वेळी नोंदणी केंद्रावर रु. ५०००/- जमा करावी.

११) सहभागी सर्व विद्यापीठाच्या प्रत्येक खेळाडूंनी उद्घाटन समारंभाचे प्रसंगी पथसंचलन करणे अनिवार्य आहे. पथसंचालनातील उपस्थितीचे आधारावर सहभाग प्रमाणपत्राचे वितरण करण्यात येईल. विद्यापीठ पथक प्रमुखाने आपले विद्यापीठाबाबतची वैशिष्ट्यपुर्ण माहिती, प्रमुख खेळाडूंची कामगीरी, ध्वजधारकाचे नावासह directorsportsgondwanauni@gmail.com या मेलवर पाठवावी.

१२) सहभागी विद्यापीठांनी त्यांचे आगमणाची आणि परतीच्या प्रवासाची सविस्तर माहिती दि. ५ फेब्रुवारी, २०२५ पुर्वी directorsportsgondwanauni@gmail.com या मेलवर पाठवावी.

१३) आवश्यकतेनुसार कपडे, पांघरुण आणि सुरक्षीततेसाठी कुलपे संघ व्यवस्थापकांनी सोबत ठेवावीत.

१४) विद्यापीठाने पाठविलेल्या यादीनुसार अधिकृत खेळाडू, संघ व्यवस्थापक आणि प्रशिक्षकांनाच त्यांच्या आकडेवारीनुसार भोजन व निवासाच्या सुविधा पुरविण्यात येतील.

१५) सर्व विद्यापीठाच्या पथक प्रमुखांनी आपल्या पथकातील प्रत्येकाचे वैद्यकीय तंदुरूस्ती प्रमाणपत्र आणि प्रतिज्ञा पत्र नोंदणीचे वेळी सादर करणे गरजेचे आहे.

१६) रेल्वे स्टेशन / बस स्टॉप ते निवासाचे ठिकाणापर्यंत ने-आण करण्याची व्यवस्था आयोजन समितीच्या वतीने करण्यात येईल.

१७) खेळनिहाय ऑनलाईन भरलेले पात्रता / प्रवेशिका (प्रत्येकी दोन प्रतीमध्ये) सोबत घेवून याव्यात तसेच दहावी डिप्लोमा, बारावी, पदवी व पदव्युत्तर मार्कशिट्स, प्रमाणपत्रांची नक्कल, ओळखपत्र व आधारकार्डची प्रत सोबत आणावी.

१८) कबड्डी खेळाच्या स्पर्धा ह्या मॅटवर घेण्याचे नियोजीत आहे.

GONDWANA UNIVERSITY Physical Education Department GADCHIROLI (M.S.)

**डॉ. अनिता लोखंडे**
संचालक, क्रीडा व शा. शिक्षण विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव -

१) मा. कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली